पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७
जा.क्र.ड/१३/कावि/ १४३/ २०१८
दिनांक– ०३/ ०९/ २०१८

प्रति,
मा.श्री/श्रीमती -----------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------

विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. ६ दिनांक ०७/०९ /२०१८

महोदय,

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१८ ची मासिक सभा ड क्षेत्रीय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे शुक्रवार दिनांक ०७/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रीय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र: ६
दिनांक:- ०७ /०९ /२०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र. ६**

दिनांक :०७ /०९ /२०१८ वेळ दुपारी १२. ०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१८ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील सभा कार्यपत्रिका क्र. ५ माहे ऑगस्ट २०१८ चा सभावृत्तांत कायम करणे

२) मौजे ताथवडे स.नं. १३४ मधील नागरीकांना सद्यस्थितीत जाणे येणेसाठी कुठलाही रस्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे स.नं. १३४ मधील नागरीकांच्या सोयीसाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या व मुंबई बेंगलोर बाहयवळण मार्गापासुन सुरु होऊन जीवननगर मार्गे ताथवडे गावठाणापर्यंत जाणा-या व ई.पी. १६ अन्वये १८ मीटर प्रस्तावित रस्त्यापासुन स.नं. १३५ च्या हद्दीलगत उत्तर दक्षिण स.नं. १३४ पर्यंत ९.०० मीटर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेस व विहीत कार्यवाही पूर्ण करणेस व या कामी सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देणेबाबतचा प्रस्ताव.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेकामी मा. आयुक्त यांनी दिनांक २७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेत दिलेल्या सूचनेनुसार ड प्रभागासाठी प्रभाग स्तरावर फेरीवाला उपसमितीचे गठन करण्यात आले असुन त्यात क्षेत्रिय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्य शासन तसेच मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रात हॉकर्स झोन निश्चित करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात आली असुन निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स झोनचे सोबतचे प्रपत्र अ चे अवलोकन होऊन झोन निश्चितीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव

४) मा. सभापती ड प्रभाग समिती यांचे सुचनेनुसार करावयाचे कामकाज

सही/-

जा.क्र.:डक्षे/१३/कावि/ १४४ /०१८
दि. ०३/ ०९/२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव, सभा शाखा,
ड क्षेत्रिय कार्यालय, राहटणी, पुणे - १७